16 SEP 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्र उभारणीत जनजातींचे योगदान

## केंगले-साबळे; 'स्वातंत्र्य चळवळीत अनुसूचित जमातीचे योगदान'वर व्याख्यान

**कोल्हापूर, ता. १५ :** राष्ट्र सशक्त आणि समर्थपणे उभे राहण्यात जनजाती समाजाचे मोठे योगदान आहे. समाजातील अनेक शूरवीर महापुरुषांनी देशासाठी प्राणांची आहुती दिलेली आहे. जनजाती समाज स्वातंत्र्ययुद्धात सर्व शक्तिनिशी लढला होता, हा इतिहास आहे, असे प्रतिपादन पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या वंदना केंगले-साबळे यांनी केले. राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, भारत सरकार आणि शिवाजी विद्यापीठातर्फे 'आजादी का अमृतमहोत्सव' कार्यक्रमाच्या अंतर्गत 'स्वातंत्र्य चळवळीत अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान' या विषयावर व्याख्यान झाले. त्यात त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हे व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

वंदना केंगले-साबळे म्हणाल्या, "अनादी काळापासून जनजातीचा समाज हा दऱ्या-खोऱ्यांमध्ये आणि घनदाट जंगलांमध्ये वास्तव्य करीत आलेला आहे. आजही त्यांची म्हणावी तितकी प्रगती झालेली नाही. या समाजाचे देशावर अतिव प्रेम आहे आणि देशाशी एकनिष्ठ आहे. स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनीही शस्त्रे घेऊन शुत्रूंवर आक्रमण केले होते. राणी तारामती, राणी दुर्गामाता त्याचबरोबर राणी लक्ष्मीबाई यांच्या सेनापती झलकारीबाई यांनी जिवावर उदार होऊन लढा दिला होता. शिवाजी महाराज डोंगर दऱ्यांमध्ये गनिमी काव्याने युध्द करीत असताना या समाजाची महाराजांना साथ लाभत होती."

अनुसूचित जनजाती आयोगाचे राष्ट्रीय संयोजक दिलीप पवार उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. शैक्षणिक संयोजक डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रशासनिक संयोजक डॉ. प्रमोद पांडव, उपकुलसचिव विलास सोयम, डॉ. अवनिश पाटील, डॉ. अविनाश भाले हे उपस्थित होते.




**कोल्हापूर : आझादी का अमृतमहोत्सवांतर्गत आयोजित व्याख्यानात बोलताना वंदना केंगले-साबळे. शेजारी दिलीप पवार, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे आदी.**


### इंग्रजांकडून शोषण

एकेकाळी हा समाज अत्यंत प्रगत व आर्थिकदृष्ट्या सक्षम होता; परंतु इंग्रजांचे राज्य आल्यावर समाजाचे इंग्रजांनी शोषण केल्याने आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती ढासळली. आदिवासी समाजाबद्दल द्वेष निर्माण होण्यासाठी इंग्रज त्यांना दरोडेखोर संबोधत होते. बिरसा मुंडा आणि त्यांच्या क्रांतिकारक सहकाऱ्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान फार मोठे आहे.

16 SEP 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजशास्त्रातून सक्रिय समाजसेवक

## प्रा. कुमार; विद्यापीठाच्या हीरक महोत्सवानिमित्त व्याख्यान



कोल्हापूर : समाजशास्त्र अधिविभागातील व्याख्यानात बोलताना प्रा. आनंद कुमार. शेजारी डॉ. जगन कराडे, डॉ. अरविंद हळदकर आदी.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : समजाशास्त्र शिकल्याने आपण समाजाचे सक्रिय सेवक बनतो, असे मत समाजशास्त्राचे अभ्यासक प्रा. आनंद कुमार यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'इंडिया बिटवीन ग्लोबल अँण्ड डी ग्लोबलायजेशन' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते.

प्रा. कुमार यांनी विविध क्षेत्रांतील जागतिकीकरण कसे झाले?, जागतिकीकरणाचा समाजातील प्रत्येक घटकावर कसा प्रभाव पडतो, यावर प्रकाश टाकला आणि यालाच जोडून अ-जागतिकीकरण संकल्पना काय आहे?, सामाजिक-आर्थिक क्षेत्रात जागतिकीकरणाच्या विरोधात राष्ट्रवादाचा मुद्दा पुढे येत आहे. जागतिकीकरण हे सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक बाबतीत पुढे येत असेल तर त्याचा अ-जागतिकीकरणातून विरोध होत आहे, असे विचार मांडले. गोवा विद्यापीठाचे डॉ. अरविंद हळदणकर, कोमल ओसवाल, अभिजित पाटील, आकाश ब्राम्हणे आदी उपस्थित होते. डॉ. प्रतिमा पवार यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रल्हाद माने करून दिली. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

16 SEP 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप वैद्यकीय क्षेत्रासाठी उपयोगी

## शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे डॉ. के. एम. गरडकर यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप" उपकरण नॅनो पार्टिकल्स ओळखण्याचे एकमेव तंत्रज्ञान आहे. हे उपकरण प्रामुख्याने नॅनो मटेरियल, कॅन्सर सेल्स, वायरलॉजी आणि वैद्यकीय क्षेत्रासह इतर अनेक क्षेत्रांमध्ये अत्यंत उपयोगी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे डॉ. के. एम. गरडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील स्तुति अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी जागतिक क्रमवारीतील शास्त्रज्ञ डॉ. सी. डी. लोखंडे, स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. डॉ. लोखंडे यांच्या हस्ते डॉ. गरडकर यांचा सत्कार केला. हे तिन्ही शास्त्रज्ञ जागतिक क्रमवारीत पहिल्या दोन टक्क्यांमध्ये निवड झालेले शास्त्रज्ञ आहेत.




**कोल्हापूर : स्तुती उपकरणात डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. सी. डी. लोखंडे, यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना रसायनशास्त्र विभागाचे डॉ. के. एम. गरडकर, सैफ केंद्राचे डॉ. आर. जी. सोनकवडे.**

पहिल्या सत्रात डॉ. सोनकवडे यांनी 'एक्स–रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप" या उपकरणाविषयी माहिती दिली. शास्त्रीय आणि औद्योगिक क्षेत्राला कशाप्रकारे याचा वापर होतो हे सुद्धा नमूद केले. त्यानंतर सर्व सहभागी शिक्षक, प्राध्यापक व संशोधक, विद्यार्थ्यांना सैफ सेंटरमधील उपकरणांची प्रात्यक्षिक दाखवली. सहभागींनी आणलेले सॅम्पलदेखील येथे टेस्ट करून दिले. याच प्रकारे दररोज संध्याकाळी विविध उपकरणे सहभागींना प्रत्यक्षपणे हाताळायला दिली जात आहेत. अत्याधुनिक उपकरणे हाताळण्याची संधी संशोधकांना दिली आहे.

निवासी प्रशिक्षणार्थींना राहण्याची व जेवण्याची उत्तम सोय आणि करवीर दर्शनासह अंबाबाई दर्शन घडविले. स्तुती उपकरण चालवणारे डॉ. सोनकवडे शिवाजी विद्यापीठातील एकमेव प्राध्यापक आहेत. भारत सरकार, शिवाजी विद्यापीठ कुलगुरू, प्र कुलगुरू आणि सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सभासदांचे डॉ. सोनकवडे यांनी आभार मानले.

सकाळ




कोल्हापूर : स्तुती कार्यशाळेतील सत्रात प्रा. के. एम. गरडकर यांचा सत्कार करताना प्रा. सी. डी. लोखंडे. शेजारी प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे.

# स्तुती कार्यशाळेत प्रा. गरडकर यांचा सत्कार

**कोल्हापूर, ता. १५ :** शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या स्तुती कार्यक्रमात प्रा. डॉ. के. एम. गरडकर यांचा सत्कार झाला. प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे यांनी त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रा. लोखंडे, प्रा. गरडकर यांच्यासह प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी संशोधकांच्या जागतिक क्रमवारीत स्थान मिळविले आहे. या निमित्ताने प्रा. गरडकर यांना गौरविण्यात आले.

प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी 'एक्स-रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप' या उपकरणाविषयी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात प्रा. के. एम. गरडकर यांनी 'ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप' या विषयी मार्गदर्शन केले. हे उपकरण नॅनो पार्टिकल्स ओळखण्याचे एकमेव तंत्रज्ञान असून याविषयी माहिती आणि त्याचे उपयोग विशद केले. हे उपकरण प्रामुख्याने नॅनो मटेरियल, कॅन्सर सेल्स, वायरलॉजी आणि वैद्यकीय क्षेत्रासह इतर अनेक क्षेत्रांमध्ये उपयोगी आहे. याच उपकरणाद्वारे सेमीकंडक्टरचे गुणधर्म सहजतेने ओळखले जाऊ शकते, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरणांना हातळण्याची संधीही दिली आहे. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसह संशोधक, प्राध्यापकही सहभागी झाले आहेत.

16 SEP 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ओझोन मित्र' उत्पादनांचा वापर महत्त्वाचा!

## नागरिकांची जबाबदारी महत्त्वाची; नवीन संशोधन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोरोना काळात प्रदूषणात घट झाली. परिणामी, ओझोनच्या ऱ्हासाला काहीअंशी आळा बसला होता. मात्र, कोरोनानंतर दिवसेंदिवस सर्वच प्रकारचे प्रदूषण वाढत चालल्याने वातावरणातील ओझोनचे प्रमाण कमी होत आहे. ओझोन थराचे रक्षण सर्वांचीच जबाबदारी असून 'ओझोन मित्र' उत्पादनांचा वापर केल्यास ओझोन ऱ्हासाला आळा बसणार आहे.



> जागतिक तापमानवाढ ही मोठी समस्या बनली असून ओझोनचा ऱ्हास ही जगासाठी चिंताजनक बाब आहे. मॉंट्रियल करार ओझोन थर वाचविण्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे. वेगवेगळ्या पर्यावरणीय कराराची सध्या काटेकोर अंमलबजावणी सुरू आहे. सामान्य नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखणे त्याचबरोबर नवीन संशोधन, तंत्रज्ञानाचा वापर काळाची गरज आहे.
>
> **- डॉ. आसावरी जाधव, प्रभारी विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ**

विरळ होत चाललेल्या ओझोन थराविषयी जागरुकता निर्माण करणे व ओझोन थराचे जतन करण्यासाठी दरवर्षी १६ सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षीची ओझोन दिनाची संकल्पना 'मॉन्ट्रियल प्रोटोकॉल ३५ : ग्लोबल कोऑपरेशन प्रोटेक्टिंग लाईफ ऑन अर्थ' आहे. ओझोनच्या रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'व्हिएन्ना करार' २२ मार्च १९८५ रोजी झाला. ओझोन थराचा क्षय करणाऱ्या पदार्थांवरील नियमावलींच्या संदर्भात १६ सप्टेंबर १९८७ रोजी 'मॉंट्रियल करार' करण्यात आला.

ओझोनचा थर पृथ्वीच्या पृष्ठभागापासून ४०-५० कि.मी.वर आढळत असून यास 'जीव रक्षक' म्हणून ओळखले जाते. ओझोनचा थर

**जागतिक ओझोन दिन विशेष...**

सूर्याकडून येणाऱ्या अतिनील किरणांपासून रक्षण करतो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. त्याचा विपरीत परिणाम ओझोन वायूच्या थरावर झाला आहे. क्लोरोफ्ल्युरोकार्बन्स, हॅलोन्स आणि मिथिल ब्रोमाईड ही ओझोनच्या ऱ्हासास कारणीभूत मुख्य प्रदूषके आहेत. ही रासायनिक संयुगे एअर कंडिशनर व रेफ्रिजेरेटर्स तयार करण्याच्या कारखान्यातून व कीटकनाशकांच्या फवारणीतून वातावरणात मिसळली जातात, जी पुढे घातक ठरतात. निवाऱ्याच्या नावाखाली वनसंपदेवर कुऱ्हाड चालवली जात आहे. परिणामी, निसर्ग चक्रात बदल झाला आहे. मानवामध्ये त्वचेचा कर्करोग, मोतिबिंदू, गुणसूत्रांमधील बदल यासारखे तर पिकांवरदेखील याचा विपरीत परिणाम होत आहे. यासाठी ओझोनचा थर महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

वाहने, कारखाने व इतर कारणांनी उत्सर्जित हानिकारक रासायनिक वायूंमुळे ओझोनवर विपरीत परिणाम होत आहे. सद्यस्थितीत औद्योगिकीकरणामुळे ओझोनला मोठे छिद्र पडले असून या वायूचा थर विरळ होत चालला आहे. याचे विपरीत परिणाम पृथ्वीवर दिसून येत असून जागतिक तापमान वाढ, ऋतुचक्रामध्ये बदल दिसून येत आहेत. सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांना रोखणे आवश्यक आहे. त्यामुळे ओझोनच्या आवरणास संरक्षण देणे ही काळाची गरज आहे, असे पर्यावरण तज्ज्ञांना वाटते.

पुण्यनगरी

# जैन सेवा संघाची भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्रामार्फत १३ कोटी रुपयांची वास्तू उभारली जाणार आहे. यातून जैन धर्माचे शास्त्रीय संशोधन व युवकांना मार्गदर्शन यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत कार्य केले जाणार आहे. या कार्यासाठी जैन सेवा संघातर्फे १ लाख ११ हजार ११ रुपयांची देणगी दिली. सुरेश मगदूम, डॉ. महावीर मिठारी, अतुल पाटणे, संदीप अथणे, अजय कोले, भारत वणकुद्रे यांनी मिळून ही देणगी दिली. अध्यासनाच्या निधी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. विजय ककडे आदी उपस्थित होते. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी जैन सेवा संघाचे आभार मानले.

16 SEP 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ स्पर्धा परीक्षा केंद्रात प्रवेशासाठी आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोग (यू.जी.सी.) योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देण्यात येणार आहे.

एससी, एसटी, ओबीसी, ईडब्ल्यूएस (नॉनक्रिमिलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा




अर्ज ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. पदवीप्राप्त व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) यूजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटेटिव्ह एक्झामिनेशन्सवर आणि केंद्राच्या कार्यालयात अर्ज उपलब्ध आहेत.

दि. २१ सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित केंद्रांना (Email ID- cceis@unishivaji.ac.in) पाठवून द्यावेत. केंद्रांच्या कार्यालयात सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहापर्यंत अर्ज जमा करावेत. प्रवेश परीक्षा दि. २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते दीड यावेळेत ऑफलाईन पद्धतीने, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत, शिवाजी विद्यापीठ येथे घेण्यात येणार असल्याची माहिती विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

तरूण भारत

# विद्यापीठ निवडणुकीच्या मोर्चेबांधणीला वेग

- ४९ हजार ९३९ मतदारांची नोंद झाल्याने बहुरंगी लढत होण्याची शक्यता
- विद्यापीठ विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंचच्या भूमिकेकडे लक्ष



तरुण भारत विशेष वृत्त

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांचा कार्यकाळ संपला असून, मतदार नोंदणीही पूर्ण झाली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच ४९ हजार ९३९ पदवीधर मतदारांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त उमेदवार निवडणुकीसाठी उभा राहणार असल्याने निवडणूक चुरशीने होणार हे निश्चित आहे. येत्या काही दिवसात निवडणूक कार्यक्रम आणि मतदार यादी जाहीर होईल. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी संघटना, प्राध्यापक, शिक्षण संस्था, प्राचार्य यांच्या बैठकांनी जोर धरला आहे. संघटनांनी आपला जाहीरनामाही तयार केला असून मतदारांची जुळवा-जुळव आणि निवडणुकीच्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. विद्यार्थी विकासाच्या मुद्द्यावर गतपंचवार्षिक निवडणुकीत तिरंगी लढत झाली होती. यंदा संघटनांची आणि मतदारांची संख्या वाढल्याने बहुरंगी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंच यांच्यामध्ये आघाडी झाली तर नोंदीत मतदारांचा दोन्ही संघटनांना फायदाच होईल. परंतू विद्यापीठ विकास मंचने स्वतंत्र निवडणूक लढवली तर त्यांची ताकद लागणार नाही, अशी चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे. असे असले तरी दुसरीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विकास मंचला सर्वोतपरी मदत करणार असून, निवडणुकीच्या कामाला लागा. तसेच सर्व मतदारांशी संपर्क करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्याचबरोबर केंद्रात आणि राज्यात त्यांचीच सत्ता असली तरी एकूण मतदारांपैकी २८ हजार मतदार विद्यापीठ विकास आघाडीकडे आहेत. उर्वरीत मतदार सर्व संघटनांकडे विभागाले आहेत. त्यामुळे विद्यापीठ विकास आघाडी आणि विकास मंचने एकत्र येण्यात शहाणपण आहे, असा सूर विद्यापीठ वर्तुळात आहे.

विद्यार्थी जीवनातील निवडणुका या तरुणाईच्या मनात लोकशाहीचा पाया अधिक भक्कम करण्याचीच प्रक्रिया असते. विद्यापीठ निवडणुका खुल्या व निर्भय वातावरणात लोकशाही पद्धतीने व्हाव्या ही विद्यार्थी संघटनांची अपेक्षा आहे.

यापूर्वीच्या निवडणुकीमध्ये विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. विद्यापीठावर नेहमीच शिक्षण संस्थापक, प्राचार्य संघटना यांचे वर्चस्व राहिले आहे. अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद, अभ्यासमंडळे, नोंदणीकृत पदवीधर यासह अन्य पदांसाठी पंचवार्षिक निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होतील. विद्यार्थी संघटनांनी आपआपले पक्ष, कार्यकर्त्यांबरोबर अंतर्गत चर्चा सुरू केलीय. यंदा शिवसेना संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेनेही निवडणूक लढवण्याची तयारी केलीय. त्यामुळे युवा सेना आणखी कोणाबरोबर युती करणार याची चाचपणी अन्य संघटनांकडून सुरू आहे. सुटा आणि शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती या संघटनाच सत्ताधाऱ्यांना ताकदीने विरोध करू शकतात, यात शंका नाही.

### कोअर कमिटीच्या बैठकीनंतर सुत्रे हलणार

विद्यापीठ विकास आघाडीसह सर्वच संघटनांची कोअर कमिटी आहे. या कमिटीच्या बैठकीत मतदानाविषयी चर्चा करून निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार सर्वच विद्यार्थी, संघटनांच्या संपर्कात आहेत. जी संघटना न्याय देईल, त्या संघटनेबरोबर जाण्याची तयारी असल्याचे इच्छुकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

### नेतृत्वाच्या आदेशाकडे लक्ष

विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य संघटनांनी निवडणुकीची जय्यत तयारी केली आहे. परंतू निवडणुकीत कोणाशी युती करायची की मित्रपक्षाला बरोबर घेऊन निवडणूक लढवायची यासंदर्भात आपल्या संघटनेचे नेतृत्व काय आदेश देणार याकडे सर्वच संघटनांचे लक्ष आहे. असे असले तरी सध्या छुप्या पद्धतीने सर्वजणच प्रचार करीत आहेत.

पुढारी

# जैन सेवा संघातर्फे भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्रामार्फत १३ कोटी रुपयांची भव्य वास्तू उभारली जाणार आहे. यातून जैन धर्माचे शास्त्रीय संशोधन व युवकांना मार्गदर्शन यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत कार्य केले जाणार आहे. या कार्यासाठी जैन सेवा संघाच्या वतीने १ लाख ११ हजार १११ रुपयांची देणगी देण्यात आली. जैन सेवा संघाचे सुरेश मगदूम, डॉ. महावीर मिठारी, अतुल पाटणे, संदीप अथणे, अजय कोले, भारत वणकुद्रे यांनी ही देणगी दिली. जैन सेवा संघ गेली २० वर्षे सातत्याने युवकांच्या मध्ये विविध प्रकल्पांतून धर्म भावना व सामाजिक बांधीलकी जोपासत आहे. त्यांच्या या कार्याचे भगवान महावीर अध्यासनाने कौतुक केले आहे. भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीची देणगी आयकर सवलत पात्र असून सर्व व्यक्ती व संस्थांनी या कार्यास देणगी द्यावी, असे आवाहन भगवान महावीर अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांनी केले आहे. या देणगीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अध्यासनाच्या निधी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील यांनी जैन सेवा संघाचे आभार मानले.

16 SEP 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योजक होण्यासाठी त्रिसूत्री महत्त्वाची : डॉ. गुरव

कसबा बावडा, ता. १५ : उद्योजक होण्यासाठी सकारात्मक विचार, कल्पकता व प्राधान्यक्रमाचे महत्त्व ही त्रिसूत्री महत्त्वाची असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्र व कौशल विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी सांगितले.

येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील केमिकल विभाग आयोजित अभियंता दिन कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, समूह चर्चा स्पर्धा झाल्या. यात महाविद्यालयातील जवळपास



कसबा बावडा : येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियंता दिन प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ए. एम. गुरव.

२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

डॉ. गुरव यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनामधील उदाहरणे देऊन संशोधन, उद्योजकता, नावीन्य आणि प्रॉडक्ट डेव्हलपमेंटसाठी प्रोत्साहित केले. अनेक उद्योजक कसे घडले याबतची माहिती दिली.

संस्थाध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष डी. चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

स्वागत व प्रास्ताविक विभागाचे प्रमुख डॉ. अमरसिंह जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राहुल महाजन, वैभवी घारे, प्रेरणा सुकटेकर यांनी केले. प्रा. किरण पाटील, प्रा. प्रियंका पाटील, डॉ. राहुल पाटील, समीर वानखेडे, निकिता दिंडे, विद्यार्थी प्रतिनिधी विश्वराज चौगुले व इतर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

1 6 SEP 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात प्रशांत हडकर यांचे मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात अभियंता दिन झाला. अभियंते प्रशांत हडकर यांनी बी. टेक सिव्हिलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी 'इनोव्हेटिव्ह मटेरियल्स अँड कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी' या विषयावर मार्गदर्शन केले. सुरुवात प्रभारी संचालक डॉ.पी.डी.पाटील यांनी विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करून केली. यावेळी हडकर म्हणाले, 'नवीन बांधकाम मटेरियल्स वापरणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी मटेरियल सायन्सचा अभ्यास अत्यावश्यक आहे. कार्बन डाय-ऑक्साइड ची निर्मिती कमी करणे हे सध्याच्या कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीसमोरील प्रमुख आव्हान आहे. त्यासाठी काँक्रीट व स्टीलला पर्याय देणे गरजेचे आहे. ग्रीन काँक्रीट, पेपरक्रिट सारखे नवीन पर्याय सुचवणे व वापरणे गरजेचे आहे. सध्या फायबर रेनफोर्सड पॉलीमर बार्स हा नवीन पर्याय सध्या वापरात असलेल्या रेनफोर्सड स्टील साठी सुचवला जात आहे. त्याची स्ट्रेंथ खूपच चांगली आहे, परंतु ते ज्वालाग्रही आहे. त्यासाठी आरसीसी स्ट्रक्चर मधील कॉन्क्रीट मध्ये जास्त कव्हर ठेवणे हा एक उपाय आहे.'

पाहुण्यांची ओळख डॉ. पी. पी. फडणीस यांनी करून दिली. महेश साळुंखे यांनी आभार मानले. व्ही. के. कांबळे, वाय्.एस्. व्हटकर, ए. आर. रेणाविकर उपस्थित होते. अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एम. सपली यांचे प्रोत्साहन लाभले.